

# टेंब्ये स्वामी : अलौकिक जीवन


**अरविंद द. दीक्षित,** कोल्हापूर
नि. शिक्षण उपसंचालक
दूरध्वनी : ०२३१-२५३०७१६

परमपूज्य श्री टेंब्ये स्वामी महाराज यांच्या समाधी शताब्दि वर्षाला आषाढ शुध्द प्रतिपदा शके १९३५ (९ जुलै, २०१३) पासून सुरूवात झालेली आहे. त्या निमित्ताने त्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणे उचित ठरेल.

प.पू. टेंब्ये स्वामी यांचा जन्म तत्कालीन सावंतवाडी संस्थानातील माणगांव येथे श्रावण कृष्ण पंचमी शके १७७६ (रविवार १३ ऑगस्ट, १८५४) रोजी झाला. या गावात त्यावेळी ब्राह्मणांची वीस-पंचवीस घरे होती. अत्रि गोत्रीय कऱ्हाडे ब्राह्मण हरिभट टेंब्ये यांचे ते नातू. हरिभटांच्या पहिल्या पत्नीचा मुलगा गणेशभट यांची वृत्ती साधी-भोळी होती. त्यांना श्री दत्तप्रभूंचा दृष्टान्त वारंवार होत असे. त्या गणेशभटाच्या कुटुंबात दत्तकृपेने बालक वासुदेवाचा जन्म झाला. वासुदेवाची आई काहीशी कर्मठ होती. तिची नित्य व्रत वैकल्ये सुरू असत. वडील गणेश भट हे वरचेवर गाणगापूर येथे जात असत. त्यामुळे आजोबा हरिभट व आईनेच वासुदेवाची जोपासना केली. लहान वयातच बालक वासुदेवाचा धार्मिकतेकडे ओढा होता. अमरकोश, रूपावली यांचे त्यांनी लहानपणीच अध्ययन केले.

वयाच्या आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली. जवळच राहणारे वेदमूर्ती विष्णूभट उकिडवे आणि वेदमूर्ती भास्कर भट ओळकर यांच्याकडे त्यांचे वेदाचे अध्ययन सुरू होते. आजोबा हरिभटांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेली गुरूचरित्र पोथी घरी होती. या पोथीचे नित्य वाचन वासुदेव करीत असत. याशिवाय वेदशास्त्र संपन्न शंभूशास्त्री साधल्ये यांच्याकडे त्यांनी ज्योतिषशास्त्राचा, संस्कृत भाषेचा अभ्यास केला. ज्योतिषशास्त्राचा पुढील अभ्यास गोव्याचे प्रसिध्द ज्योतिषी श्री. निळकंठ पद्ये यांच्याकडून झाला.

आजोबा हरिभटांचे निधन झाल्यानंतर वासुदेव पौरोहित्याची कामे करू लागले. माणगांव परिसरात त्यांना बरीच कामे मिळू लागली. विवाह बंधनात गुंतण्याची वासुदेवाची तयारी नव्हती. तथापि, आईची इच्छा म्हणून त्यांनी तशी संमत्ती दिली. शके १७९७ (इ.स. १८७५) मध्ये वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांचा विवाह रांगजागड येथील बावाजीपंत गोडे यांच्या मुलीशी झाला. तिचे नांव त्यांनी अन्नपूर्णा असे ठेवले. अन्नपूर्णा पायाने काहीशी अधू होती. मात्र, मध्यस्थांनी ही गोष्ट दडवून ठेवली होती.



श्री. प.प. सद्गुरु श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामीमहाराज

एकदा नृसिंहवाडीहून निघून चालत माणगावला येत असताना कोल्हापूरला महालक्ष्मीचे दर्शन घेतले व त्या मुक्कामात गांवी नेण्यासाठी एक दत्तमूर्ती माणगावी घेऊन जावे असे त्यांना वाटले. परंतु, पैशाची सोय कांहीच नसल्याने तो विचार मनातल्या मनातच राहिला. येताना कागल बाजारपेठेत त्यांना एक मूर्तीकार भेटला व आठ दिवसात पाहिजे तशी मूर्ती घडवून देतो असे त्यांना सांगितले. पैशाची काळजी करू नका असेही सांगितले. वासुदेवांनी मूर्ती घेऊन जाण्यासाठी त्याच गांवी मुक्काम केला. त्या मूर्तीकाराने श्री दत्तगुरूंची मूर्ती त्यांना करून दिली. वासुदेवाजवळ मूर्तीकाराला देण्याइतके पैसे नव्हते. कसा-बसा एक रूपया त्यांनी काढून दिला. भोवती असलेल्या लोकांनी वीस-पंचवीस रूपये गोळा करून दिले.

ही मूर्ती घेऊन वासुदेव माणगावला घरी आले. सुरूवातीला घरच्याच एका खोलीत मूर्ती ठेवून, नित्य पूजा सुरू झाली. गावातील एका महिलेला दत्त गुरूंचा दृष्टान्त झाला व त्या महिलेने स्वखुषीने आपली जमीन दत्तमूर्ती प्रतिष्ठापनेसाठी देऊ केली. गांवकऱ्यांच्या मदतीने मंदिराचे काम साकार झाले. तेथे एक विहीर पण खोदली. शके १८०५ (इ.स. १८८३) मध्ये मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना झाली. वासुदेव पण मंदिरातच वास्तव्याला राहिले. सुरूवातीला काही दिवस दुपारी जेवणापुरते घरी जात. नंतर नंतर घरी जाणेही बंद झाले. रोज सकाळी माणगावात फिरून कोरडी भिक्षा मागून आणत व त्याचाच स्वयंपाक शिजवून देवाला नैवेद्य दाखवत, हळूहळू प्रत्येक शनिवारी देवळात मोठा समारंभ होऊ लागला, सायंकाळी आरतीनंतर देवळाभोवती पालखीची प्रदक्षिणा होई. लोकही भरपूर असायचे.

क्रमाक्रमाने माणगावच्या दत्तमंदिराचे महत्व वाढू लागले. गुरू व्दादशीला व दत्तजयंतीला फार मोठी गर्दी होई. मंदिरात या काळात तीन मूर्ती जमा झाल्या, कोल्हापूर जिल्ह्यातील कागलहून आणलेली एक व सावंतवाडीहून मिळालेली एक. गावातील एका सोनाराने प्रवासात वापरण्यासाठी दिलेली एक अशा तीन मूर्ती, माणगांवी होत्या.

अशा प्रकारे सात वर्षे मंदिरात राहिल्यानंतर वासुदेवांना श्री दत्तगुरूंकडून माणगांव सोडण्याचा आदेश झाला. त्यानुसार शके १८११ मध्ये (इ.स. १८८९) दत्तमूर्ती बरोबर घेऊन पत्नी अन्नपूर्णेसह त्यांनी माणगांव सोडले. कांही दिवस नृसिंहवाडी येथे गोविंद स्वामींच्या घरी राहिले. त्यांना एक मुलगा झाला. पण तो अल्पायुषी निघाला. काही दिवसांनी गंगाखेड मुक्कामी त्यांची पत्नीही निर्वतली. पत्नीचे तेरावे करून चौदाव्या दिवशी त्यांनी संन्यास धर्म स्वीकारला. उज्जयनी येथे नारायण स्वामी यांचेकडून त्यांनी विधिवत दंड स्वीकारला व त्यांना वासुदेवानंद सरस्वती असे नांव देण्यात आले. नारायणानंद सरस्वती, अनिरूध्द नंद सरस्वती व अच्युतानंद सरस्वती अशी त्यांची गुरू परंपरा आहे.

संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर साऱ्या भारतभर त्यांचे भ्रमण सुरू झाले. काशीपासून रामेश्वरपर्यंत आणि व्दारकेपासून राजमहेंद्रिपर्यंत ते फिरले. ही पदयात्रा केवळ दोन छाट्या, दोन लंगोट्या आणि एक कमंडलू एवढ्या साहित्यासह चालू असे. उज्जयिनी, ब्रह्मावर्त, बद्रीकेदार, गंगोत्री, हरिव्दार, पेटलाद, तिलकवाडा, व्दारका, चिखलदरा, मेहरापूर-नरसी, बढवाणी, तंजावर, मुक्ताला, पवनी, हाबनूर, कुरगडी, गरूडेश्वर याठिकाणी त्यांनी संन्यास जीवनातील चातुर्मास काढले. अनेक ठिकाणी त्यांनी दत्तमूर्तीची स्थापना केली. वेळोवेळी त्यांना दत्त साक्षात्कार होई व त्यांच्या आदेशानुसारच स्वामींच्याकडून वागणूक होई. कुठे जायचे, कुठे थांबायचे, याबद्दल त्यांना दत्तगुरूंकडून सूचक आदेश होत असत.

अखेर गरुडेश्वर येथे वयाच्या एकसष्टाव्या वर्षी आषाढ शुध्द प्रतिपदा शके १८३६ (२३ जुन, १९१४) मध्ये त्यांनी देवासमोरच देहत्याग केला. ते संन्यासी असल्याने दुसऱ्या दिवशी विधिवत् त्यांचे शरीर नर्मदा पात्रात समर्पित करण्यात आले. गरूडेश्वर येथे त्यांचे समाधी मंदीर आहे आणि तेथे

त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर होतो.

वासुदेवानंद सरस्तींची ग्रंथरचना फार मोठी आहे. गुरूचरित्राचे संस्कृत रूपांतर (गुरू संहिता), दत्तपुराण (संस्कृतमध्ये), दत्त महात्म्य (मराठी ओवीबध्द), सप्तशती गुरूचरित्र (मराठी ओवीबध्द), माघमहात्म्य (मराठी), स्त्री शिक्षा (संस्कृत), शिक्षात्रय (कुमार शिक्षा, युवा शिक्षा आणि वृध्द शिक्षा) इत्यादि ग्रंथरचना त्यांनी केली. याशिवाय शेकडो मराठी व संस्कृत स्तोत्रे त्यांनी रचली. घोरकष्टोद्धारण स्तोत्रम् हे स्तोत्र म्हणजे तर टेंब्ये स्वामींनी दत्तभक्तांना दिलेली अमूल्य भेट आहे. कितीही घोर संकट आले असता या अव्दितीय व प्रभावी स्तोत्राचा पाठ, श्रध्दायुक्त अंत:करणाने केला असता संकट निवारण होते असा श्रध्दाळूंचा अनुभव आहे.

ब्रह्मावर्ताला टेंब्येस्वामी महाराज चार वेळा गेले. त्यातल्या एका मुक्कामात त्यांनी सातशे ओव्यांचा गुरूचरित्र सप्तशती हा मराठीमधून ओवीबध्द ग्रंथ राहिला. यांतील प्रत्येक ओवीतील तिसरे अक्षर स्वतंत्रपणे वाचले असता, भगवत्‌गीतेतील पंधरावा अध्याय तयार होतो. त्याच बरोबर श्री दत्तात्रेयांच्या सोळा अवतारांच्या कथा सांगणारा संस्कृत ग्रंथ श्री दत्तात्रेय षोडशावतारा: त्यांनी लिहिलेला आहे.

अशा या टेंब्येस्वामींचे पूर्वायुष्य ज्या माणगाव (ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग) येथे गेले, त्या गांवी आज टेंब्ये स्वामींचे भव्य मंदिर उभारले गेले आहे. तसेच त्यांनी स्थापन केलेले दत्तमंदीरही भक्तांचे श्रध्दास्थान बनले आहे. आजही श्री टेंबेस्वामी सूक्ष्मरूपाने तेथे वास करतात, अशी भक्तांची भावना आहे, त्याठिकाणी भक्तांसाठी अद्यावत धर्मशाळा बांधलेली आहे. कुडाळ व सावंतवाडी येथून माणगांव येथे जाण्यासाठी वाहन व्यवस्था आहे.

कोंकणातील सुप्रसिध्द लेखक (कै.) विद्याधर भागवत यांनी प्रस्थान व योगी या दोन कादंबऱ्यामधून टेंब्ये स्वामींचे जीवनकार्य रेखाटले आहे. प्रस्थान ही कादंबरी त्यांनी १९८४ साली लिहिली. यामध्ये स्वामींचे बालपण, विवाह व माणगाव येथील त्यांचे वास्तव्य यांवर विवेचन केले आहे. या कादंबरीचा उत्तरार्ध 'योगी' भागवतांनी १९९० साली लिहिला. स्वामींचे ग्रंथकर्तृत्व, स्वामींची भ्रमंती, अध्यात्मिक यात्रा याचा तपशील योगी कादंबरीत आहे.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी तत्कालीन सावंतवाडी संस्थानात बोलल्या जाणाऱ्या कऱ्हाडी ब्राह्मण बोलीचा वापर या पुस्तकांमध्ये केलेला आहे. १९६८ साली एक सूचक स्वप्न श्री. विद्याधर भागवतांना पडले व त्यापासून प्रेरणा घेत या कादंबऱ्यांचे लेखन झाले असे श्री. भगवतांनी प्रस्तावनेत नमूद केले आहे. प्रस्थान व योगी अशा एकत्रित स्वरूपात ही कादंबरी प्रकाशित झालेली आहे.

***

## माझी वारी

पंढरीची वारी, घडावी एकदा तरी

बोलावलंस रे पांडुरंगा, आले मी तुझ्या दारी ।

चालता चालता, देह शिणूनही जाई

अभंग गाता गाता, वाटा सरूनही जाई ।

भान नाही रे देहाचे, भान नाही रे कशाचे

टाळ मृदुंगांच्या गजरात, मन गढूनही जाई ।

आले मी तुझ्या दर्शनाला, ऊर भरूनही येई

तुला नेत्री साठवून, तुझ्या पदस्पर्शाने मी

विरूनही जाई ।

**सौ. रमा दीक्षित**, कोल्हापूर